145
161
143

ग्राम पंचायती मार्फत, जन्म, मृत्यु आणि विवाह नोंदणी.

(103)

महाराष्ट्र शासन.

ग्राम विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांकः व्हीपीरम २९९८/३०३९०-ई,

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक : २१ डिसेंबर १९९८

शासन निर्णय :- १९५८ च्या ग्राम पंचायत कायद्यातील कलम ४५(१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे व त्याच कायद्याच्या परिशिष्ठ १ मधील नोंद क्रमांक ५९ च्यातरतुदीनुसार शासनाने विशिष्ट वा सर्व-सामान्य आदेशानुसार विहित केलेल्या तक्त्याबरहुकूम जन्म, मृत्यू व विवाह यांची नोंदणी करणे हे ग्राम पंचायतीच्या अनेक कर्तव्यापैकी एक कर्तव्य आहे. सहकार आणि ग्राम विकास विभागाच्या निर्णय क्रमांकः व्हीपीरस्-२४६१/४२६२६-ई, दिनांक १२ फेब्रुवारी १९६३ अन्वये अशा नोंदणीकरितां शासनाने निरनिराळे तक्ते ठरवूनदिले असूनही निरनिराळ्या कारणास्तव या कामाची अंमलबजावणी करण्यास ब-याच जिल्ह्यातील ग्राम पंचायती असमर्थ ठरल्या आहेत. त्यामुळें राज्याच्या निरनिराळ्या विभागांत हे काम तलाटी, पोलीस पाटील वगैरे सारख्या पदाधिकाऱ्यामार्फत अद्यापही चालूं आहे. विवाह, जन्म व मृत्यु रजिस्टर मधील नोंदी व जीवन विषयक आंकडेवारी या बाबी अतिशय महत्वाच्या असल्याकारणाने ही रजिस्टरें योग्य त-हेने व काटेकोरपणे ठेवणे हे फार अगत्याचे आहे. कारण या रजिस्टरांमधील जन्म - मृत्युच्या तारखासंबंधीचे उतारे ही निरनिराळ्या कामासाठी खात्रीशीर माहिती म्हणून दाखल करावी लागते. म्हणून या सर्व प्रश्नांचा सखोल विचार राज्याच्या निरनिराळ्या संबंधित खात्यांशी शासनाने केला आहे आणि १९५८ च्या मुंबई ग्राम पंचायत कायद्यातील कलम ४५(१) व त्याच कायद्याच्या परिशिष्ट १ मधील नोंद क्रमांक ५९चे अनुसार व सहकार आणि ग्राम विकास खात्या-चे शासन आज्ञा व्हीपीरस-२४६१/४२६२६-ई, दिनांक १२ फेब्रुवारी १९६३ ही रद्द करुन शासन आता खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(अ) ग्राम पंचायतीच्या ठेवावयाच्या इतर कागदपत्राबरोबरच ग्राम पंचायत सचीवाने जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु आणि विवाह नोंदणीची रजिस्टरे ठेवावीत.

(ब) जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु व विवाह यांची माहिती गांव कोतवालाने ग्राम पंचायत सचिवास पुरवावी.

(क) या शासन निर्णयास जोडलेल्या परिशिष्ट १ मधील फॉर्म अ, ब, क आणि ड प्रमाणे नोंदणी महसुली गांववार करण्यात यावी (म्हणजेच प्रत्येक महसुली गावांसाठी एक स्वतंत्र रजिस्टर ठेवावे). नोंदणी करतांना सदरहू शासन निर्णयास जोडलेल्या परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

एच-११३२(१००० २-१२-९८)

(ड) ग्राम पंचायतीच्या सचिवानें ठेवलेल्या रजिस्टरांतील प्रत्येक महिन्याच्या उताऱ्याच्या दोन प्रति पुढील महिन्याचे ५ तारखेच्या आंत संबंधीत गट विकास अधिकारी यांजकडे पाठवाव्या. एखाद्या गावांत एखाद्या महिन्यांत जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु, उपजत-मृत्यु व विवाह यांच्या कांहीही नोंदी झाल्या नसतील तरीही त्याने सदरहू गावांचे उतारे "नोंद नाही" असा शेरा मारून पाठवावयाचे असतात हे त्याने ध्यानात ठेवावे. असा उतारा आल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी १ प्रत आपणाकडे ठेवून २री प्रत सहाय्यक आरोग्य संचालक प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग, पुणे १ यांजकडे त्याच महिन्याच्या १२ तारखेपर्यंत पाठवावी व त्या प्रतीच्या उपरी पत्राची एक प्रत संबंधीत आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडेही रवाना करावी. गट विकास अधिकारी यांनी त्यांना मिळालेल्या उताऱ्यावरून गांववार माहिती संकलित करावी व आलेले उतारे कायमचे कागदपत्र समजून जपून ठेवावेत, तसेच त्याने परिशिष्ठ १ मध्ये दाखविल्याप्रमाणे आवक नोंदणी रजिस्टर ठेवावे. ग्रामपंचायत सचिवाकडून मिळालेले उतारे मे. सहाय्यक आरोग्य संचालक, प्रभारी जीवन विषयक आकडेवारी विभाग, पुणे १ यांचेकडे पाठवितांना, गट विकास अधिकारी यांनी स्वतःच्या अमलाखालील विभागातील गांव/तालुका/गट यांचे क्षेत्रफळात काही फेरफार झालेले असतील तर ते कळवावेत.

२. वरील व्यवस्था १ एप्रिल १९६९ पासुन अमलांत आणण्यात यावी. आज पर्यंत पोलिस पाटील, तलाठी आदि पदाधिकारी यांचेकडे ही रजिस्टरे ठेवण्याचे जे काम होते ते दिनांक ३१ मार्च १९६९ पासून बंद करण्यांत यावे.

३. जरी ही माहिती पुरविण्याची जबाबदारी गांव कोतवालावर सोपविलेली असली तरी लोकांचे प्रतिनिधी या नात्याने ग्राम पंचायतीतील सभासदांनासुध्दा सदरहू कामी सहाय्य देणे शक्य होईल असे शासनास वाटते. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सुचविण्यांत येते की त्यांनी सर्व गट विकास अधिकाऱ्यांना सुचना द्याव्यात की, गट विकास अधिकाऱ्यांनी प्रत्येक ग्राम पंचायतीच्या सभासदांना एक पत्र पाठवून या कामाचे महत्व त्यांना पटवून द्यावे व त्यांना त्यांचे विभागांत झालेल्या जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु व विवाह यांची माहिती ग्राम पंचायत सचिवास पुरविण्यास विनंती करण्यांत यावी. ग्राम पंचायत सचिव यांनाही त्यांच्या जबाबदारीबद्दल जाणीव देण्यात यावी आणि त्यांना असे कळविण्यांत यावे की त्यांनी जन्म, मृत्यु, उपजतमृत्यु व विवाह यांची एकही नोंद न वगळता घडलेल्या सर्वच्यासर्व घटनांच्या नोंदी होतील यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी. जरूर तर स्थानिक व्यक्ती व संस्था यांचाही यासाठी उपयोग करून घ्यावा.

४. सहाय्यक आरोग्य संचालक (प्रभारी जीवन विषयक आकडेवारी विभाग) पुणे, यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी दोन्ही परिशिष्टांच्या प्रती सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व गट विकास अधिकारी यांना त्वरित पाठवाव्यात. तसेच सहाय्यक आरोग्य संचालक, प्रभारी

जीवन विषयक आंकडेवारी, पुणे यांनी सदर तक्ते हे प्रमाणीत तक्ते म्हणून छापून मिळावे. यासाठी शासनाच्या नगर विकास आरोग्य व गृह निर्माण विभागाकडून मंजूरी घ्यावी आणि ग्राम पंचायतींच्या मागणीप्रमाणे गट विकास अधिकारी यांचे मार्फत त्यांचा पुरवठा करण्याचीही व्यवस्था करावी. अर्थातच छपाईच्या कामास अवधि लागणार असल्याने छापील फॉर्मस् उपलब्ध होईपर्यंत गट विकास अधिकाऱ्यांनी परिशिष्ठ १ व २ मधील फॉर्म् व सूचना आपले कार्यालयातूनच (मराठीमध्यें) चक्रमुद्रीत करुन घ्याव्यांत आणि त्या ग्राम पंचायतीना पुरवाव्यांत.

५. पुढील अधिकारी हे सदर रजिस्टरांचे तपासणी अधिकारी राहतील.

१) विस्तार अधिकारी (ग्राम पंचायती)

२) गट विकास अधिकारी

३) प्रशासकीय अधिकारी, जिल्हा परिषद

४) उप- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

७) सहाय्यक आरोग्य संचालक, (प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग, पुणे- १).

वरील अधिकाऱ्यांनी ग्राम पंचायतीचे भेटीचे वेळी सदरहू रजिस्टरे तपासावीत आणि ती योग्य रीतीने ठेवण्यांत आलेली आहेत की नाहीत याची खात्री करुन घ्यावी. याशिवाय सांख्यिकी सहायक (जीवन विषय आंकडेवारी) आणि जिल्हा परिषदेचे व शासकीय आरोग्य विभागाचे कर्मचारी हे तपासणीसाठी जेव्हां रजिस्टरे मागतील तेव्हां ग्राम पंचायत सचीवाने ती त्यांना उपलब्ध करुन द्यावीत.

६. सदरहू माहिती ग्रामपंचायत सचिवास पुरवीण्याची जबाबदारी ही कोतवालाची आहे. याबद्दलच्या सूचना महसूल व वन विभागानें महसूल अधिकाऱ्यामार्फत कोतवालांना द्याव्यात. त्या विभागाने सदरहू जबाबदारी कोतवालांच्या कामाच्या यादीमध्ये अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी. रेव्हेन्यु अकौंटस् मॅन्युअलमध्यें अंतर्भूत असलेला गांवचा नमुना क्रमांक १४ रद्द करण्याची कार्यवाहीहि त्या विभागाने करावी व तसेच तलाठयांच्या कामासंबंधीच्या यादीमध्यें योग्य ती दुरुस्ती करावी.

७. या नवीन व्यवस्थेला जास्तीत जास्त प्रसिध्दी देणे अगत्याचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी आपापल्या कक्षेतील गट विकास अधिकाऱ्यांना असे कळवावे कीं गावोगांवी दौंडीसह सर्व प्रसिध्दीच्या मार्गाचा अवलंब करुन या व्यवस्थेस प्रसिध्दी देण्यांत यावी व त्या योगे ही रजिस्टरे ठेवणे व त्यांत नोंदाव्रयाची माहिती ग्रामपंचायत सचिवांना विनचूक कळविणे

एच्- ११३२(१००० - २-१२-६८)

किती महत्वाचे आहे हे जनमानसावर बिंबविण्यांत यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वृ. प्रभाकर,

उप सचिव, महाराष्ट्र शासन,

ग्राम विकास विभाग

प्रतः-

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व गट विकास अधिकारी,

आरोग्य संचालक, पुणे,

सर्व आरोग्य संचालक (प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग) पुणे,

परिशिष्ट - १

नमुना अ

जन्म नोंदणीचे रजिस्टर.

१. जिल्हयाचे नांव

२. माहे

३. पंचायत समितीचे (विकास गटाचे) नांव

४. तालुक्याचे नांव

५. महसुली गांवाचे नांव

६. ग्रामपंचायतीचे नांव

| अ.क्र. | जन्म नोंदणीची तारीख | जन्माची तारीख | लिंग | जन्मलेल्या मुलाचे/मुलीचे नांव | जन्म ठिकाण | बापाचे नांव | आईचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

| बापाचा कायमचा राहण्याचा पत्ता | राष्ट्रीयत्व (×) बापाचे | राष्ट्रीयत्व (×) आईचे | धर्म बापाचा | धर्म आईचा | या बाळंतपणाचे वेळी मातेचे वय (पूर्ण वर्षात) | बाळंतपणाची कितवी खेप (म्हणजे) या जन्मासह एकूण किती मुले जन्मली. |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १०(अ) | १०(ब) | ११(अ) | ११(ब) | १२ | १३ |

| बाळंतपणात सोडवणूक कोणी केली. | माहिती देणा-याचे नांव व पत्ता | शेरा : |
|---|---|---|
| १४ | १५ | १६ |

निबंधकाची (ग्राम पंचायत सचिवाची) सही

(प्रत्येक महिन्याचे शेवटी)

(×) ही माहिती फक्त परदेशी म्हणजेच भारतीय नागरीक नसलेल्यांचे बाबतीत भरावी.

एच्- ११३२(१०००+२-१२-६८)

परिशिष्ट - १

(106)

नमुना- ब

मृत्यु नोंदणीचे रजिस्टर

१ • जिल्ह्याचे नांव

२ • माहे सन

३ • पंचायत समिती (विकास गटाचे ) नांव

४ • तालुक्याचे नांव

५ • महसुली गांवाचे नांव

६ • ग्रामपंचायतीचे नांव

| अ.क्र. | मृत्यु नोंदणीची तारीख | मृत्युची तारीख | मयत झालेल्या व्यक्तीचे नांव | बापाचे अथवा लग्न झालेली स्त्री असल्यास नव-याचे नांव | मृत्युचे ठिकाण | मृताचे वय | मृताचे लिंग | (×) राष्ट्रीयत्व | धर्म |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| मृताचा कायमचा राहण्याचा प-ता | मृत्युचे कारण | मृत्युचे कारण हे वैद्यकीय तपासणी अंती ठरविले आहे किंवा नाही. | वैद्यकीय मदत मिळाली होती काय? असल्यास कोणत्या प्रकारची? | माहिती देणा-याचे नांव व प-ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |

निबंधकाची ( ग्रामपंचायत सचिवाची) सही

( प्रत्येक महिन्याचे शेवटी )

(×) ही माहिती फक्त परदेशी, म्हणजेच भारतीय नागरिक नसलेल्यांचे बाबतीत भरावी.

एच्- ११३२ (१०००+ २- १२- ६८)

परिशिष्ट - १ 

नमुना क्र. क

## उपजत मृत्यु नोंदणीचे रजिस्टर

१. जिल्ह्याचे नांव

२. माहे. सन

३. पंचायत समिती (विकासगटाचे )नांव

४. तालुक्याचे नांव

५. महसुली गांवाचे नांव

६. ग्रामपंचायतीचे नांव

| अ.क्र. | मृत जन्म नोंदणीची तारीख | मृत जन्म झाल्याची तारीख | लिंग | मृत जन्माचे ठिकाण | बापाचे नांव | आईचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

| बापाचा वायमचा राहण्याचा पत्ता | (x) राष्ट्रीयत्व बापाचे | आईचे | धर्म बापाचा | आईचा | या बाळंतपणाचे वेळी आईचे वय (पूर्ण वर्षात) | बाळंतपणांत सोडवणूक कोणी केली डॉ. नर्स दाई वगैरे |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९अ | ९ब | १०अ | १०ब | ११ | १२ |

| माहिती देणाऱ्याचे नांव व पत्ता | शेरा |
|---|---|
| १३ | १४ |

निबंधकाची (ग्राम पंचायत सचिवाची) सही

(प्रत्येक महिन्याचे शेवटी)

(x) ही माहिती फक्त परदेशी, म्हणजेच भारतीय नागरिक नसलेल्यांचे बाबतीत भरावी.

एच्- ११३२(१०००+२-१२-६८)

परिशिष्ट - १

नमुना - ड

(108)

विवाह नोंदणीचे रजिस्टर सन

१. जिल्हयाचे नांव

२. माहे सन

३. पंचायत समिती (विकासगटाचे) नांव

४. तालुक्याचे नांव

५. महसुली गावाचे नांव

६. ग्रामपंचायतीचे नांव

| अ.क्र. | विवाहाची माहिती मिळाल्याची तारीख | विवाह झाल्याची तारीख व ठिकाण | वराचे संपूर्ण नांव राहण्याचे ठिकाण (संपूर्ण पत्ता) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

| वधुचे संपूर्ण नांव वय राहण्याचे ठिकाण (संपूर्ण पत्ता) | धर्म वराचे वधुचे | (×) राष्ट्रीयत्व वराचे वधुचे | वराचे वडीलांचे अथवा पालकाचे संपूर्ण नांव व पत्ता | वधुच्या वडीलांचे अथवा पालकांचे संपूर्ण नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| माहिती देणाऱ्याचे नांव व पत्ता | शेरा |
|---|---|
| १० | ११ |

निबंधकाची (ग्रामपंचायत सचिवाची) सही

(प्रत्येक महिन्याचे शेवटी)

(×) ही माहिती फक्त परदेशी, म्हणजेच भारतीय नागरिक नसलेल्यांचे बाबतीत भरावी.

एच्- ११३२ (१०००+ २-१२-६८)

एफ १२३२(१००० २-१२-६४)

प्ररिशिष्ट :- १

"गट विकास अधिकारी यांचे कार्यालयांत ठेवावयाचे रजिस्टर.

जन्म आणि मृत्यु उताऱ्यांचे आवक रजिस्टर.

पंचायत समिती (गटा) चें नांव.  जिल्हा  सन

| अनुक्रमांक | महसुली गावाचें नांव. | ग्राम पंचायतीचे नांव. | अलिकडील (नजिकच्या) शिरगणतीप्रमाणे महसुली गावांची लोकसंख्या. | जन्म मृत्युचे उतारे मिळाल्याची तारीख: जाने- -वारी. | फेब्रु- -वारी. | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगष्ट | सप्टे- -बर. | ऑक्टो- -बर. | नोव्हे- -बर. | डिसें- -बर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | | | ५ | | | | | | | | ६ |

टीप :- उतारे ज्या महिन्यांचे त्या महिन्यांचे रकान्यांत ते ज्या गावांचे असतील त्या गावांच्या नावापुढे मिळाल्याची तारीख लिहावी. उदा. सुपे गांवचे माहे मे महिन्याचे उतारे तारीख १५ जुन रोजी मिळाले असतील तर ते मिळाल्याची तारीख मे महिन्याचे रकान्यांत १५-६ अशी लिहावी.

टीप :-

१) अनौरस जन्माचे बाबत, अनौरस असा शेरा शेऱ्याचे रकान्यांत लिहावा व वडिलांचे म्हणून इतर कोणाचे नांव लिहू नये. मात्र त्या बालकाचे पितृत्व मान्य करणाऱ्या व्यक्तिने व जन्मदात्या आईने हे मूल त्या उभयतांचे असल्याचे लेखी निवेदन दिल्यास, त्या व्यक्तीचे नांव वडील म्हणून दाखल करावे.

२) (गुणीत जन्माबाबत) एका वेळेस एकापेक्षां अधिक बालके जन्मली असल्यास, प्रत्येक बालकाची स्वतंत्र नोंद करावी व माहितीसाठी शेऱ्याचे रकान्यांत योग्य ते स्पष्टीकरण लिहावे.

## उपजत मृत्यू नोंदणी रजिस्टर

रकाना क्रमांक : १ :- जन्म नोंदणी रजिस्टरच्या रकाना क्रमांकः १ करितां दिलेल्या सूचनेप्रमाणे.

रकाना क्रमांकः २ ते ४ :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

रकाना क्रमांक : ५ :- जन्म नोंदणी रजिस्टरच्या रकाना क्रमांकः ५ साठी दिलेल्या सूचनेबरहुकूम..

रकाना क्रमांक : ६ ते ११ :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

रकाना क्रमांक : १२ :- जन्म नोंदणी रजिस्टरच्या रकाना क्रमांकः १४ करितां दिलेल्या सूचनेबरहुकूम.

रकाना क्रमांकः १३ ते १४ :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

टीप :-

१) अनौरस उपजत मृत्यु झालेल्या बाल्याबाबत जन्म नोंदणी रजिस्टर संबंधीच्या सूचनांमध्ये टीप क्रमांकः १ खाली दिलेल्या सूचनेप्रमाणे.

२) एकावेळेस मातेस एकाहून अधिक उपजत मृत बालके झाली असतां -- जन्म नोंदणी रजिस्टर संबंधीच्या, सूचनांमध्ये टीप क्रमांकः २ खाली दिलेल्या सूचनाप्रमाणे.

## मृत्यू नोंदणी रजिस्टर.

रकाना क्रमांक : १ :- जन्म नोंदणी रजिस्टरच्या रकाना क्रमांकः १ साठी दिलेल्या सूचनेप्रमाणे.

रकाना क्रमांकः २ ते ५ :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

रकाना क्रमांक : ६ :- जन्म नोंदणी रजिस्टरच्या रकाना क्रमांक : ६ साठी दिलेल्या सूचनेप्रमाणे.

रकाना क्रमांक : ७ :- जर मयत व्यक्ति, मरणसमयी वयाने १ वर्षापेक्षां जास्त असेल तर त्या व्यक्तीचे वय पूर्ण वर्षात ह्या रकान्यात लिहावे. जर तिचे वय १ वर्षापेक्षां कमी असेल तर ते पूर्ण महिन्यांत, १ महिन्यापेक्षां कमी असेल तर ते पूर्ण दिवसांत लिहावे.

रकाना क्रमांकः ८ ते १० :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

रकाना क्रमांक :- ११ :- या रकान्यांत खालील सूचनाबरहुकूम पत्ता लिहावा --

१) मुले आणि कर्त्या व्यक्तीवर अवलंबून असलेल्या अविवाहित व्यक्तीच्यांबाबत आई-वडील किंवा पालक.

२) विवाहित स्त्रिचे बाबतीत पतीचा पत्ता, विधवेच्याबाबतीतही तिच्या पतीचा पत्ता.

३) मयत हा कोणावरही अवलंबून नसून जर स्वतःच करतासवरता असेल तर त्याचा जो असेल तो पत्ता.

155

रकाना क्रमांक : १२ :- जर वैद्यकीय तपासणी करून मृत्यूचे कारण निश्चित केलेले असेल तर तेच या रकान्यांत लिहावे. जर ते तसे झाले नसेल तर निबंधकाने (ग्राम पंचायत सचिवाने) मृताचे नातलगाकडे चौकशी करून व स्वतःची खात्री करून योग्य ते कारण नमूद करावे. जर मृत्यू आत्महत्या किंवा खून याने ओढवला असेल तर निबंधकाने त्याला ज्ञात असलेल्या व खऱ्या घटनांची नोंद घेऊन स्वतःच्या आकलनाप्रमाणे मृत्यूचे कारण नमूद करावे. अपघातामुळे किंवा जंगली श्वापदांच्या हल्ल्यामुळे अचानक झालेल्या मृत्यूबाबत योग्य ते कारण सुस्पष्ट लिहावे.

उदाहरणार्थ :- भाजल्यामुळे अपघाती मृत्यू, रेल्वे अपघात, बुडून मेले, सर्पदंशामुळे मृत्यू, कुत्री चावल्याने मृत्यू, विषबाधेमुळे अपघाती मृत्यू इत्यादी.

रकाना क्रमांक : १३:- वैद्य/शल्य चिकित्सक यांनी रोग्यावर उपचार केले असतील व मृत्यूचे निदान निश्चित ठरविले असेल तर ह्या रकान्यांत "होय" असे लिहावे. जर मृत्यूचे कारण तपासणी करून निश्चित ठरविले नसेल तर "नाही" असे लिहावे.

रकाना क्रमांक : १४ :- जर मृत्यूपूर्वी वैद्यकीय उपचार झाले असतील तर "डॉक्टरांनी उपचार केले" असे लिहावे. उपचार झाले नसतील तर "नाही" असे लिहावे. म्हणजे जर रोग्यावर मृत्यूपूर्वी अलोपॅथिक डॉक्टर, (आयुर्वेदिक डॉक्टर), हकीम (युनानी डॉक्टर) ह्यानी उपचार केले असतील तर लिहावे. जर मृत्यूपूर्वी वैद्यकीय उपचार केले नसतील तर "वैद्यकीय उपचार नाही" असे लिहावे.

रकाना क्रमांकः १५ व १६ :- हे रकाने स्वस्पष्ट आहेत.

## परिशिष्ट - २.

**जन्म मृत्यूंचे रजिस्टर ठेवण्याबाबतच्या व तसेच त्यांतील नोंदीत केव्हां फेरफार करतां येतात याबाबतच्या सर्वसाधारण सूचना.**

१) सदरहू रजिष्टरे ही नेहमी ग्रामपंचायत कार्यालयांत ठेवावीत.

२) जानेवारी ते डिसेंबर अशा दर वर्षासाठी एकच रजिस्टर ठेवावे. प्रत्येक वर्षी १ जानेवारी पासून नवीन रजिस्टरे उघडावीत. अशी रजिस्टरे ती ज्या वर्षाची असतील ते वर्ष संपल्यानंतर २ वर्षेपर्यत ग्रामपंचायतकार्यालयांत ठेवावीत. त्यानंतर ती रजिस्टरे संबंधित गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाकडे कायमचे रेकार्ड म्हणून पाठवावीत.

३) अगोदर नोंद झालेल्या माहितीमध्ये कांही लेखी चुका असतील, माहिती वगळली गेली असेल किंवा कांही बदल करावयाचे असतील तर ते बदल किंवा दुरुस्ती ग्रामपंचायत सचिवाने गट विकास अधिकारी किंवा संबंधीत वरिष्ठ अधिकारी यांचे पूर्व लेखी अनुमतीने करावी.

४) पूर्वी नोंद व्हावयाचे राहून गेलेले जन्म, उपजत मृत्यू, मृत्यू व विवाह, हे जेव्हां तपासणी अधिकारी शोधून काढतात, तेव्हां अशा शोधून काढलेल्या घटनांची नोंद चालू महिन्याचे शेवटच्या नोंदीनंतर करून त्या घटना कोणत्या तारखेस घडल्या ते संबंधीत रकान्यामध्ये लिहावे. अशा शोधून काढलेल्या नोंदीबाबत शेऱ्याचे रकान्यांत योग्य ती टीप लिहावी.

-------